अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | शुक्रवार दि. १८ नोव्हेंबर २०२२ | वर्ष : २१ वे | अंक : ५२ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८

## व्याजाच्या पैशासाठी चाकूने खुनी हल्ला करणाऱ्या सावकारास सात वर्षे सक्तमजुरी

**सोलापूर** : व्याजाच्या पैशासाठी चाकूने खुनी हल्ला करणाऱ्या सावकारास जिल्हा व सत्र न्यायाधीश आर.एन.पांढरे यांनी सात वर्षे सक्तमजुरी व एक हजार रुपये दंडाची शिक्षा ठोठावली. तसेच फिर्यादीस नुकसान भरपाई म्हणून ५० हजार रुपये देण्याचा आदेशही न्यायालयाने दिला आहे. रविकांत चंद्रकांत जत्ती (वय-३५, रा.उमानगरी, मुरारजी पेठ) असे शिक्षा सुनावण्यात आलेल्या सावकाराचे नाव आहे. दीपक नामदेव चव्हाण यांनी आरोपी चंद्रकांत याच्याकडून व्याजाने पैसे घेतले होते. ३ डिसेंबर २०१६ रोजी रात्री साडेआठच्या सुमारास व्याजाच्या पैशातून मोरया शाळेजवळ आरोपीने चाकूने फिर्यादीच्या पाठीवर, पोटावर व मानेवर वार करून ठार मारण्याचा प्रयत्न केला. या गुन्ह्याचा तपास फौजदार आर. जी.सांगळे यांनी करून न्यायालयात आरोपीविरोधात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

## भारत विरुद्ध न्यूझीलंड यांच्यात रंगणार आज पहिली टी-२० सामना




**नवी दिल्ली** : भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील टी२० मालिका उद्या अर्थात १८ नोव्हेंबरपासून सुरू होणार आहे. हार्दिक पांड्याच्या नेतृत्वाखाली भारतीय संघ टी२० विश्वचषकातील पराभवानंतर एक नवी सुरुवात करणार आहे. टी-२० मालिकेसाठी भारतीय संघ : हार्दिक पांड्या (कर्णधार), ऋषभ पंत (विकेटकीपर), शुभमन गिल, ईशान किशन, दीपक हुडा, सूर्यकुमार यादव, श्रेयस अय्यर, संजू सॅमसन (विकेटकीपर), वॉशिंग्टन सुंदर, युजवेंद्र चहल, कुलदीप यादव, अर्शदीप सिंह, हर्षल पटेल, मोहम्मद सिराज, भुवनेश्वर कुमार, उमरान मलिक.

# प्रेयसीसाठी प्रियकर गेला जीव द्यायला, बिचारा 'जाळी'त सापडला, सुदैवाने वाचला

## बीडच्या युवकाचा मंत्रालयात असाही 'प्रताप'

सुराज्य/सोलापूर

**प्रेमाची अमर कहाणी सर्वश्रुत आहे. कधी कधी प्रेमभंग होत असला तरी खास करून प्रेमाचे नाते अतूटही असते. आत्महत्या केलेल्या बलात्कार पीडित प्रेयसीला न्याय द्या म्हणून गेल्या तीन वर्षांपासून टाहो फोडणाऱ्या प्रियकराला कुणीच दाद दिली नाही. त्यामुळे संतापून त्याने चक्क मंत्रालयाच्या पाचव्या मजल्यावरून उडी मारत जीवन संपवण्याचा प्रयत्न केला. मात्र त्याच्यासाठी काळ आला होता पण वेळ आलेली नव्हती. त्यामुळे सुदैवाने तो बचावला. मंत्रालयाच्या गॅलरींना जाळ्या बसवल्यामुळे तो त्यात पडला. त्यामुळे त्याला कुठलीही इजा झाली नाही.गुरूवारी मंत्रिमंडळाची बैठक सुरू असतानाच हा प्रकार घडल्याने एकच खळबळ उडाली. पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. पिडीत प्रेयसीच्या न्यायासाठी चक्क तिच्या प्रियकरावरच मंत्रालयात आत्महत्येचा प्रयत्न करण्याचा बाका प्रसंग ओढवला.**



झाले असे की, बलात्कार पीडित आपल्या प्रेयसीला न्याय मिळावा, यासाठी प्रियकर मागील तीन वर्षांपासून मंत्रालय आणि पोलीस स्टेशनचे उंबरठे झिजवत आहे. परंतु शासनाने त्याकडे पूर्णतः दुर्लक्ष केले आहे. अखेर त्या प्रियकराला मंत्रालयातच टोकाचे पाऊल उचलावे लागले. प्रियकराने मंत्रालयाच्या पाचव्या मजल्यावरून उडी मारत आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. बापू नारायण मोकाशी असे या प्रियकराचे नाव असून, तो ४३ वर्षांचा आहे. हा प्रियकर बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील पारगाव जोगेश्वरी गावातील रहिवासी आहे.त्याने पाचव्या मजल्यावरून उडी मारली, पण मंत्रालयात जाळी लावण्यात आली असल्याने तो जाळीवर पडला, त्यामुळे त्याला फार दुखापत झाली नाही. पोलिसांनी त्या प्रियकराला ताब्यात घेतले असून, वैद्यकीय तपासणीसाठी रुग्णालयात पाठवले.

### या पूर्वीही झाला असा प्रयत्न...

ऑगस्ट महिन्यात झालेल्या विधिमंडळ अधिवेशनादरम्यान आधीही मंत्रालयाच्या गच्चीवर चढून एका व्यक्तीने आत्महत्येचा प्रयत्न केला होता. मात्र, त्यावेळी अग्निशमन दलाच्या जवानांनी त्याला सुखरूप खाली उतरवले. असले प्रकार पुन्हा घडू नयेत म्हणून मंत्रालयाच्या गॅलरीला जाळी बसवण्यात आली आहे.तरीही पुन्हा प्रकार घडल्याने पोलीस दल चक्रावून गेले आहे.

### परत प्रश्नचिन्ह...

मंत्रालयात राज्य मंत्रिमंडळाची बैठक होती. त्यामुळे मंत्रालयात वर्दळ होती. अशातच अचानक मोकाशी हा त्याच्या मागण्यांवर शासनाकडून दखल घेतली जात नसल्याने थेट आत्महत्या करायला मंत्रालयात आला. जिथे सुरक्षा जाळी होती, त्या ठिकाणी पोलिसांनी तातडीने धाव घेतली. पोलिसांनी त्याची समजूत काढून सुरक्षा जाळीतून त्याला बाहेर काढले त्यानंतर बराच वेळ पोलिसांनी चौकशी करून त्याला ताब्यात घेतले. मागील काही दिवसांपासून ही दुसरी घटना घडली असल्याने प्रशासनाची मात्र डोकेदुखी वाढली आहे. घटनेमुळे मंत्रालयातील सुरक्षा व्यवस्थेबाबत पुन्हा प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे.

## कुर्डुवाडीत आर.पी.एफ पोलिसाची आत्महत्या?

सुराज्य/कुर्डूवाडी

कुर्डुवाडी येथेल रेल्वे सुरक्षा बदलांमध्ये कार्यरत असणाऱ्या आरपीएफ जवानाने सरकारी ९ एम एम पिस्टलमधून स्वतः वर गोळी झाडून आत्महत्या केली. घटना गुरुवार दि.१७ रोजी दु.२.१५ च्यासुमारास कुर्डूवाडी रेल्वे सुरक्षा बलाच्या ड्युटीरुम ए बीट मध्ये घडली. प्रधान आरक्षक पो.कॉ. हुसेन दावल पिंजार (वय ५२ रा. सोलापुर) असे आत्महत्या केलेल्या जवानाचे नाव आहे. त्यांच्या पश्चात्त त्यांची पत्नी, दोन मुले व एक मुलगी असा परिवार आहे.

ही याबाबत मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार मयत जवान हुसेन दावल पिंजार (वय ५२) गेल्या पाच वर्षापासून कुर्डुवाडी येथे कार्यरत होते. प्रथम रेल्वे काराखाना येथे काही काळ त्यांनी सेवा केल्यानंतर कुर्डुवाडी येथील रेल्वे सुरक्षा बलाच्या ए बीट मध्ये कार्यरत होते. त्यांच्याकडे सरकारी शस्त्रागार संभाळण्याची जबाबदारी होती. त्यांनी त्याच शस्त्रागारातील सरकारी ९ एम एम पिस्टल मधून स्वतःला डाव्या छातीवर गोळी झाडून घेत आत्महत्या केली. यावेळी घटनास्थळावर त्यांच्याशिवाय कोणीच नव्हते अशी माहिती तेथील सहकाऱ्यांकडून मिळाली. याबरोबरच त्यांनी काही महिन्यांपूर्वी राजीनामा देत असल्याचे प्रशासनाला कळवले होते.पण मुदतीतच त्यांनी राजीनामा मागे घेत असल्याचे लेखी



प्रशासनाला पुन्हा कळवले.

या राजीनामा नाट्याबाबत तसेच घटना स्थळी कोणी इतर कर्मचारी कसे नव्हते, कामाच्या ठिकाणी त्यांना काही त्रास होता का याबाबत पो.निरीक्षक संदीप हुड्डा यांना विचारले असता त्यांनी कामाच्या ठिकाणी तो जवान ठिक होता काही अडचण नव्हती. राजीनामा हे त्यांचे वैयक्तीक कारण होते. शिवाय त्यांनी स्वतः राजीनामा मागारी घेत असल्याचे लिहूनही दिले होते. काही दिवसात त्यांच्या बेसीकमध्ये फरक पडणार होता. त्यामुळे पेन्शनही चांगली मिळेल म्हणून त्यांनी राजीनामा मागारी घेतला असे ही सांगितले.

कुर्डुवाडी येथे आज कोर्ट कॅम्प असल्याने आम्ही कोर्ट कॅम्प साठी स्टेशनवर होतो. बाकी सर्व कर्मचारी रेल्वे स्टेशन व त्यांच्या कर्तव्यावर होते. पिंजार यांनी गोळी झाडून घेतल्याचे प्रथम पो.कॉ. खाडे यांनी आम्हाला कळवले. त्यानंतर आम्ही घटना स्थळी आलो असता ही घटना आमच्या निदर्शनास आली.याबाबत तात्काळ ग्रामीण पोलिसांना कळवून त्यांना शवविच्छेदनासाठी ग्रामीण रूग्णालयात हलवण्यात आले. यावेळी कुर्डुवाडी शहर पोलिस ठाण्याचे सहा.पो.निरीक्षक विक्रांत बोधे यांच्यासह उपविभागीय पो.अधिकारी विशाल हिरे यांनी घटना स्थळाला भेट दिली. मात्र आत्महत्येचे नेमले कारण मात्र समजू शकले नाही. याबाबत रेल्वे सुरक्षा बलाचे पो.नि. संदीप हुड्डा यांनी कुर्डुवाडी पोलिसांत फिर्याद दाखल केली आहे.अधिक तपास सहायक पोलिस निरीक्षक विक्रांत बोधे करीत आहे.

### अनुत्तरीत प्रश्न

- आरपीएफने आत्महत्या केली असेलतर पिस्तूल टेबलावर कशी आली?
- स्वतः गोळी मारुन घेतली त्याचे रक्त पाठीमागील भितीवर पडले, तर तो टेबलवर कसा पडला? आत्महत्या करणारी व्यक्ती अनेकदा डोक्यात गोळी मारते. या घटनेत छातीत गोळी लागली आहे.
- या पोलिस ठाण्यात सीसीटीव्ही असतील तर त्यातून सत्य समोर येईल?
- छातीत गोळी मारून घेऊन आत्महत्या केल्यामुळे अनेक प्रश्न उपस्थित होत असल्याने संशय व्यक्त होत आहे.
- दोन आरपीएफ मधील भांडणात हत्या झाल्याची कुजबुज ऐकू येत आहे.

## चालकास मारहाण करून ट्रक पळवले

**सोलापूर** : ट्रकमध्ये प्रवासी म्हणून बसलेल्या दोघा अनोळखी तरुणांनी ड्रायव्हरला मारहाण करून त्याचा फरशीने भरलेला ट्रक घेऊन पसार झाले. ही घटना पुणे महामार्गावरील तेलंगवाडी (ता. मोहोळ) येथे बुधवारी रात्रीच्या सुमारास घडली. सोहेल मेहबूब वाडीकर (वय २८ रा. सिंदगाव (ता.तुळजापूर) असे जखमी झालेल्या ट्रक चालकाचे नाव आहे. त्याला उपचारासाठी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. तो काल रात्री बसवकल्याण येथे आपल्या ट्रक मध्ये फरशी भरून सोलापूर मार्गे मुंबई येथे निघाला होता.

रात्री ९ वाजेच्या सुमारास पुणे नाका येथे दोन अनोळखी इसम पॅसेंजर म्हणून त्याच्या ट्रकमध्ये बसले. पुढे तेलंगवाडी येथे ट्रक आल्यानंतर दोघा तरुणांनी त्याला बेदम मारहाण केली. आणि त्याला खाली उतरण्यास लावले. त्यानंतर त्याचा ट्रक घेऊन प्रसार झाले. हा प्रकार घडल्यानंतर जखमी ट्रक चालक वाडीकर याला टोलनाका कर्मचाऱ्यांनी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले. या घटनेची नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

## घोंगडे वस्तीतील भंगार दुकानाला लागली आग; गोदाम जळून खाक

सुराज्य/सोलापूर

भवानी पेठेतील घोंगडेवस्ती येथील पठाण बाबा दर्गा शेजारी असलेल्या हिप्परगी यांच्या ऑईल मिलच्या जागेत भाडे करू असलेल्या एका स्क्रॅप भंगार दुकानाला गुरुवारी रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास आग लागली.आग एवढी भयानक होती की या आगीत सारे भंगारचे गोडावून जळून खाक झाले.बाजूलाच वेल्डिंग दुकान तसेच क्लाऊड दुकान तसेच ऑऱ्इल मिल होती वेल्डिंग दुकान व प्लाऊडच्या दुकानाचे किरकोळ नुकसान झाले आहे. ऑऱ्इल मिलची कोणती हानी झाली नाही अशी माहिती तेथील नागरिकांनी दिली. वेल्डिंगच्या दुकानात गॅस टाकी होती परंतु ती उडाली नाही असे तेथील नागरिकांनी सांगितले.

परंतु अग्निशामक दलाच्या गाड्या वेळेत पोचल्यामुळे आग आटोक्यात आणण्यात आली. इतरत्र कुठे हानी झाली नसल्याचे कळते.मिळालेल्या माहितीनुसार घोंगडे वस्ती मध्ये पठाण बाबा



दर्गा शेजारी बाशा या व्यक्तींचे स्क्रॅप भंगारचे दुकान आहे.या दुकानात लोखंड, प्लॅस्टिक, कागदी पुठे, कागद रद्दी आदींचा मोठा साठा आहे. हे मोठे गोडावून आहे. रात्री गोडावून बंद करून मालक घरी गेल्यानंतर ९ वाजण्याच्या सुमारास ही आग लागली.आग कशामुळे लागली हे रात्री उशिरापर्यंत कळू शकले नाही. परंतु नागरिकांनी याबाबत तात्काळ जोडभावी पोलीस ठाण्यास तसेच अग्निशामक दलास कळवले. जोडभावी पेठ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शिवाजी राऊत यांच्यासह पोलीस पथक त्या ठिकाणी तात्काळ पोहोचले.

अग्निशामक दलाने पाण्याचा मारा करून आग आटोक्यात आणली. यात कोणत्याही प्रकारे जीवितहानी झाली नाही. परंतु हे गोडावून जळून खाक झाल्याचे सांगण्यात आले.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



'या' कारणामुळे तरी आपण एकत्र आलोय!!

| कल्याण |
| --- |
| 177-51-669 |

| मेन बाजार |
| --- |
| 167-40-235 |

## अखेर महापालिका आयुक्त पी.शिवशंकर यांची बदली

### नव्या आयुक्तपदी शितल उगले-तेली यांची नियुक्ती

सुराज्य/सोलापूर

महापालिकेचे आयुक्त पी.शिवशंकर यांची अखेर नागपूर येथे वस्त्रोद्योग संचालक या पदावर बदली करण्यात आली आहे. त्यांच्या जागी शीतल तेली-उगले (भाप्रसे) यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाचे अपर मुख्य सचिव (सेवा) नितीन गद्रे यांनी तसे आदेश काढले आहेत.



गेल्या अनेक महिन्यांपासून आयुक्त शिवशंकर यांच्या बदलीची चर्चा सुरू होती. अनेक वेळा त्यांची बदली झाल्याची अफवा उठत होती. अखेर गुरूवारी त्यांच्या बदलीचे आदेश प्राप्त झाले. नागपूर येथे वस्त्रोद्योगचे संचालक या पदावर शीतल तेली-उगले यांच्या जागी त्यांची नियुक्ती करण्यात आली तर उगले यांची शिवशंकर यांच्या जागी म्हणजे आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

पी शिवशंकर यांची ३० मे २०२० कोरोनाच्या काळात सोलापूरच्या आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली.

कोरोना काळात त्यांनी केलेल्या कार्याची सर्वत्र प्रशंसा झाली होती. त्यानंतर त्यांनी मिळकत कर रिव्हिजन, सार्वजनिक नळ तोड मोहीम, कर्मचाऱ्यांवर कारवाई यासह काही निर्णय वादग्रस्त ठरले होते. त्यांना आतापर्यंत रेकॉर्डब्रेक ७०० पेक्षा जास्त कर्मचाऱ्यांवर कारवाईचा बडगा उचलला होता.



पालिकेचे कामकाज ऑनलाईन करण्यात त्यांचा महत्त्वाचा वाटा होता. त्यांचे काही निर्णय चांगले तसेच काही निर्णय वादग्रस्तही ठरले. रिव्हीजन कर वाढवणे, सार्वजनिक नळ तोडणीला अनेकांनी विरोध दर्शवला होता. दरम्यान काही महिन्यांपूर्वी महापालिका कामगार संघटना कृती समितीच्या वतीने कर्मचाऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर आयुक्त पी शिवशंकर यांच्या बदलीसाठी मोर्चाही काढला होता.

अखेर आज गुरुवारी शासनाने त्यांच्या बदलीचे आदेश काढले आहेत. शीतल उगले ठरणार पहिल्या महिला आयुक्त पी.शिवशंकर यांच्या जागी येणाऱ्या शीतल उगले या सोलापूरच्या पहिला महिला आयुक्त ठरणार आहेत. नागपूर येथे वस्त्रोद्योग संचालकपदापूर्वी त्यांनी पुणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त म्हणूनही काम पाहिले आहे.

### फटाके उडवताना पोलिस-कामगार संघटनेत वाद

फटाके उडवताना कामगार संघटनेचे अशोक जानराव आणि पोलिसांमध्ये वादावादीचा प्रसंग निर्माण झाला पालिका आयुक्तांची बदली झाल्यानंतर महापालिका कामगार संघटना कृती समितीचे अशोक जानराव यांनी पालिकेच्या आवारात फटाके आणले होते. त्यावेळी पोलिसांनी त्यांना अटकाव केला. एक कामगार संघटनेचे कार्यकर्ते आणि पोलिसांमध्ये थोडवेळ वादावादीचा प्रसंग निर्माण झाला. वादावादी नंतर संबंधित पोलिसांनी आणखी पोलिसांची जादा कुमक पालिका आवारात मागून घेतली.